ता.क्र.2019/भु.सं/रा.म.मा.क्र.161/कावी-

दिनांक 20/06/2019

120

# जाहीर प्रगटन

**विषय :- राष्ट्रीय महामार्ग क्र. 161 साठी संपादीत झालेल्या शेत गट क्र. 47 बाबत जाहीर प्रगटन प्रसिध्दी करुन आक्षेप सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** 1. रा.म.मा.क्र. 161 मौ. आराटी ता. कळमनुरी येथील जाहीर निवाडा दिनांक 05/08/2018
2. या कार्यालयाने मोबदला वाटप करणेसाठी दि. 10/10/2018 अन्वये दिलेली नोटीस.

उपरोक्त संदर्भिय क्र. 1 अन्वये मौजे आराटी येथील निवाडा जाहीर/ घोषीत करण्यात आला. संदर्भिय क्र. 2 अन्वये जाहीर निवाड्यानुसार लाभार्थ्यांना नोटीस देण्यात आल्या त्यामध्ये श्री विठ्ठल श्रीपती पोटे यांना नोटीस देण्यात आली .

देण्यात आलेल्या नोटीस नुसार श्री विठ्ठल श्रीपती पोटे यांनी सादर केलेल्या संचिकेवर इतर अधिकारांमध्ये बहिण हरणाबाई तुका व आई बायजुबाई श्रीपती (गट क्र. 46) अशी नोंद आहे.

या व्दारे आपणांस कळविण्यात येते की, गट क्र. 46 किंवा जमीन मालकाच्या (गट क्र. 47) मालकी बाबत/ मोबदला हक्काबाबत काही आक्षेप असल्यास दि.05/07/2019 पर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय, कळमनुरी येथे आक्षेप व याबाबतचे पुरावे सादर करावेत.

त्यानंतर प्राप्त आक्षेपांवर विचार केला जाणार नाही व श्री. विठ्ठल श्रीपती पोटे यांना मोबदला वाटप करण्यात येईल.

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी**
**कळमनुरी**

**प्रतिलीपी :**

1. मंडळ अधिकारी वाकोडी यांना देऊन कळविले जाते की प्रकरणात स्वत: हजर राहुन तलाठी यांना सहकार्य करुन संयुक्त अहवाल सादर करावा..
2. तलाठी सज्जा साळवा यांना देवून आदेशित करण्यात येते की वरील प्रमाणे जाहीर प्रगटण प्रसिध्द करुन प्रसिध्दी पंचनामा व आक्षेप घेवून या कार्यालयास सादर करावे.
3. जिल्हा माहीती व सुचना अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना देऊन कळविण्यात येते कि, मा.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी**
**कळमनुरी**

Scanned by CamScanner